# प्रकरण -२

# ‘वकिल्या पारधी’ कादंबरीचे स्वरुप

# प्रकरण –२

## ‘वकिल्या पारधी’ चे स्वरुप

लक्ष्मण गायकवाड हे नाव दलित साहित्याच्या प्रांतामधील एक महत्त्वाचे नाव होय. मराठी भाषेमध्ये दलित साहित्याचा प्रवाह रुढ झाल्यानंतर अनुसूचित जाती–जमाती, भटके–विमुक्त, इ. सामाजिक समूह आपल्या पारंपारीक दु:खाची मांडणी करू लागले. अशा जातीपैकीच विमुक्त जातीच्या वेदना लक्षात घेऊन लक्ष्मण गायकवाड यांचे ‘उचल्या’ हे आत्मकथन दलित साहित्याच्या कार्यकक्षेत येऊन दाखल झाले. मराठी भाषेच्या प्रांतामध्ये लक्ष्मण माने यांच्या ‘उपरा’ या आत्मकथनानंतर चर्चेत आलेले आत्मकथन ‘उचल्या’ हे होय. या आत्मकथनातून विमुक्त जातीच्या दु:खाचे विविध अनुभव मांडले गेले. त्यामुळे मराठी साहित्यामध्ये हे अनुभव नव्यानेच मांडले गेल्याने या आत्मकथनाची विषेश चर्चा मराठी साहित्यात झाली. या आत्मकथनानंतर लक्ष्मण गायकवाड यांनी विविध स्वरुपाची वाङ्मयनिर्मिती करण्यास प्रारंभ केला.

त्यामध्ये दुभंग, वडार वेदना, वकिल्या पारधी, आणि चीनी मातीचे दिवस इ. कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या असून ‘समाजसाहित्य आणि स्वातंत्र्य’ या नावाची वैचारिक कादंबरीही त्यांनी लिहिली आहे. या वाङ्मयनिर्मितीबद्दल त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यामध्ये १९८८ साली साहित्य अकादमी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका १९९०, पुणे महानगर पालिका २००१, महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार २००३, महाराष्ट्र शासनाचा साहित्य पुरस्कार २००३ आणि अन्य पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. याशिवाय त्यांनी विविध सामाजिक संस्थांचे सदस्य म्हणून कामकाजही पाहिले आहे. त्यामध्ये खालील महत्त्वाच्या संस्थांमध्ये त्यांचा सहभाग होता.त्यामध्ये महाराष्ट्र फाउंडेशन,

मानवी हक्क आयोग, राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राष्ट्रीय साहित्य अकादमी इ. संस्थांचे ते सदस्य होते.

या वाङ्मयनिर्मिती बरोबरच लक्ष्मण गायकवाड हे प्रत्यक्ष सामाजिक चळवळीमध्ये सहभागी असलेले कृतिशील कार्यकर्ते आहेत. विमुक्त जाती वरती होत असलेल्या सामाजिक अन्यायाच्या विरोधामध्ये दाद मागणे, अन्यायग्रस्त जाती-जमातींना न्याय मिळवून देणे इ. मध्ये ते सतत कार्यमग्न असतात. त्यांच्या या वाङ्मयीन आणि सामाजिक कर्तुत्वाचा परिपाठ म्हणूनच त्यांना साहित्य अकादमीच्या मराठी सल्लागार मंडळाचे निमंत्रक म्हणूनच सन्मानित केलेले आहे. त्यांनी लिहिलेली 'वकिल्या पारधी' ही कादंबरी सामाजिक अनुभवावर बेतलेली आहे, विमुक्त जातीमधील गुन्हेगार समजलेल्या पारध्यांचे जीवन या कादंबरीचे आशयसूत्र आहे. या कादंबरीचे थोडक्यात स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

'वकिल्या पारधी' ही लक्ष्मण गायकवाड यांची कादंबरी पारधी समाजाचे चित्रण करणारी आहे. कादंबरीची सुरूवात लेखक लंगोटपारध्यांमधील 'बिरडीस' या पात्राने करतो. लंगोटपारध्यांची ही वस्ती घनदाट जंगलाच्या पायथ्याशी छोटी छोटी पालं टाकून वसलेली असते. गेल्या कित्येक पिढ्यांपासून जंगलाच्या सान्निध्यात राहिल्याने ते सर्वस्वी जंगलावरच अवलंबून असतात. जंगल, जंगलातील प्राणी, झाडे, पशू-पक्षी, त्यांचे आवाज, जनावरांचे हंबरणे, वाघाच्या डरकाळीचा आवाज हे नित्यनियमाचं असल्याने तेच आपले सगे सोयरे, पालनहार असे ते समजत असत. हिंस्त्र प्राण्यांच्या घुमट वासावरून पारधी लोक वस्तीच्या संरक्षणासाठी आपली हत्यारे घेऊन सावध होत असत. कोडीयारा देवी ही पारधी लोकांचे कुलदैवत असल्यामुळे ते आपल्या दिवसाची सुरूवात कोडीयारा देवीच्या पाया पडून व एखाद्या जनावराची शिकार मिळावी म्हणून करत असत. शिकारीला जाताना धनुष्यबाण, तीर, चामड्याची पिशवी, कुऱ्हाड, परशी इ. साधनसामग्री



16116

घेऊन त्यांचे वाहन असलेल्या वनगाईवर बसून निघून जात असत. पारधी लोक अंधारात राहून आपलं अंधकारमय जीवन जंगलाच्या कुशीत जगत असल्याने त्यांना कुठल्याही प्राण्याचे भय कधीच नसायचे. पारधी वस्तीवर बिरडीस व त्याची बायको जळन, तीरमाऱ्या व त्याची बायको हरणी, लगमण्या व त्याची बायको गवत, व त्यांची सर्व मुले-बाळे असा संपूर्ण परिवार राहायचा. दिवसभर पारधी लोक आपल्या शिकारीच्या मस्तीत असायचे, आणलेली शिकार आठ-पंधरा दिवस संपूर्ण पारधी वस्ती खायची. हरणाची शिकार मिळाल्यास त्याच्या चामड्याचा लंगोट बनवण्यासाठी व हरणाच्या पायांच्या नसांचा शिकारीचे फासे बनविण्यासाठी उपयोग करायचे. व मोहाच्या फुलांपासून तयार केलेली दारू पिऊन रात्री आपल्या शौर्याची, शिकारीची आणि आपल्या वंशजांच्या पराक्रमांची गीतं गायची. आपला इतिहास काय आहे हे जमातीतील लोकांना व मुलांना सांगायचे त्या संदर्भात कादंबरीत आलेले वर्णन असे आहे- ''पूर्वी पृथ्वीतलावरती आपलंच राज्य होतं, कंदमूळे खाऊन, गाईचं दुध पिऊन आपन जगत होतो. प्राण्यांचं रक्षण करत होतो. म्हणून आपण रक्षण करणारे राक्षसगुणी, ह्या देशाचे मूळ वंशज. पण व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या देवगुणी लोकांनी आपल्या घरादारांवर नांगर फिरवला . कधी काळी कोडीयारा देवी ही आपली महाराणी असून अनेक देवगुणी लोकांना तिने यमसदनास पाठवलं. त्या काळातल्या आपल्या राजाला देवगुणी लोकांनी कपट कारस्थानानं हरवलं आणि आपण लोक जंगलामध्ये दिवसरात्र लपून बसू लागलो. त्यामुळे आपल्या पूर्वजांनी, शिजवलेलं अन्न खायचं नाही, देवगुणी लोकांचा बदला घेण्यासाठी पंधरा दिवस एका ठिकाणी कधीच मुक्काम करायचा नाही. आपलं राज्य परत मिळविल्याशिवाय तीर, कामठा, बाण खाली ठेवायचा नाही, पायात चप्पल घालायची नाही, दिवा दिसणाऱ्या गावापासून बारा कोसाच्या अंतरावर मुक्काम करायचा. घरात कधीही दिवा लावायचा नाही. वर्षातून एक दिवस दुश्मनाच्या रक्तानं

कोडीयारा देवीच्या समोर साजरा करायचा व आपले राज्य परत मिळवायचे अशी शपथ घेतली." (पृ.१४) असा संदेश बिरडीस आपल्या पुढच्या पिढिला गाण्याच्या रूपाने देत होता व सर्व पारधी वस्ती त्याचे पालन करत जगत होती.

बिरडीस आपल्या मुलाला रानपळ्याला शिकारीचे प्रशिक्षण देत होता. शिकार करताना काय काय अडचणी येतात, हत्यारे कशी बाळगायची, वनगाईवर बसून हरणाला फासे टाकून कसे पकडायचे, गाईच्या पोटाला चिकटून जंगलात मार्ग कसा काढायचा, वनगाईवर थाप मारून पळण्याचा वेग कसा वाढवायचा व तिच्या पोटाखाली पायाने आढी मारून कसे थांबवायचे या सर्व गोष्टी आपल्या मुलाने शिकाव्या म्हणून तो काळजी घेत होता. येताना हे बाप-लेक चितरांची शिकार करून भरपूर चितरे, बाभळीचा डिंक, आणि मधमाशांच्या पोळ्यातील मध द्रोणातून भरून घेऊन यायचे बघता बघता बिरडीसचा मुलगा रानपळ्या आणि तीरमाऱ्याचा मूलगा बंदूक्या हरणाच्या वेगाने अचूक नेम साधून दररोज कुठली ना कुठली शिकार करून येऊ लागले. त्यांना लहानपणापासूनच कोणत्या ऋतुमध्ये कोणती फळे खावीत, कोणत्या झाडाची फळे औषधगुणी असतात, कोणत्या झाडाचा पाला कधी खावा, मोहाची फुले नेहमी खायची असतात अशी शिकवण मिळाली होती. त्यामध्येच कोडीयारा देवीची यात्रा करण्यासाठी एके दिवशी जात-पंचायत बसते. बिरडीस हा जात-पंचायतीचा प्रमुख होता. पूर्वी कधी देवीला नरबळी देण्याची पद्धत रूढ होती. पण ती आता बंद होऊन राक्षसगुणींना हरवणाऱ्या यमाचा अवतार 'रेडा' बळी देण्याची पद्धत रूढ झाली. त्याची शिकार करण्यासाठी सर्व पारधी वस्ती जमते. बलवान अशा रेड्याची शिकार करून यात्रेच्या दिवशी त्याला न्हाऊन-धुवून परंपरेनुसार ढोल, ताशे, झांजा याच्या गजरात त्याची पुजा करण्यात येते, सर्व बायका-मुले ओढ्याच्या पाण्यामध्ये स्वच्छ आंघोळ करतात. त्यानंतर रेड्याच्या मानेवर वार करून उसळून येणारे रक्त लोक प्रसाद

म्हणून प्राशन करतात. त्यामध्येच बिरडीस मोठ्याने गाण्याच्या माध्यमातून म्हणतो,'हे कोडीयारा देवी आम्ही तुझ्या आदेशाचं पालन करून रेड्याचा बळी तुझ्यासमोर दिलेला आहे. तू आम्हाला पावन हो. आमच्या मुलाबाळांना, बायका लेकरांना सुखी जगव, आम्हा आदिवासी राक्षसगुणी पारध्यांना भरपूर ताकद दे जेणेकरून आम्ही देवगुणी लोकावर विजय मिळवू.' अशी कोडीयारा देवीला याचना करत असल्याचा प्रसंग कादंबरीमध्ये आलेला आहे. दुसऱ्या दिवशी रिवाजाप्रमाणे ते अन्य ठिकाणी स्थलांतर करतात.

बदलत्या काळानुसार बिरडीसने आपल्या पूर्वजांचे संकेत निर्माण केले. बाराही महिने मिळेल त्या प्राण्याची शिकार करणे व ती विकणे, पैसे साठवून पालाच्या वळचणीला खड्डा खोदून त्यात पुरणे त्याचप्रमाणे, पारवे खाल्ल्याने वात होत नाही, पानकुत्र्याचे मटण खाल्ल्यास महारोग होत नाही, रानडुक्कर खाल्ल्यामुळे शरीर मजबूत आणि घट्ट होते. या कल्पना त्याने रूढ केल्या होत्या.

पारधी जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात बदल होत असतानाच इंग्रजी सत्तेच्या विरोधात आंदोलन पेटले गेले. या आंदोलनामुळे पारधी जमात आपल्यावर इंग्रजांनी केलेल्या अत्याचाराचा बदला घेण्यासाठी पेटून उठते. पारधी जमातीचा प्रमुख बिरडीस हा आपल्या समुहासह या आंदोलनात सहभागी होतो. इंग्रजांच्या विरोधात त्यांच्याच दारुगोळा आणि बंदुका भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना ते पुरवू लागतात. एवढेच नाही तर दारुगोळा वाहून नेणाऱ्या रेल्वेचे रूळ उखडून इंग्रज अधिकाऱ्यांना आपल्या कोडीयारा देवीला त्यांचे बळी देतात. इंग्रजांनी केलेल्या क्रूर अत्याचाराचा बदला पारधी जमात या स्वरुपात घेते. या आंदोलनामध्ये पारधी जमात अग्रभागी असली तरी या आंदोलनाचे श्रेय ढोकी गावचे जमिनदार बाजिराव देशमुख घेतात. इतकेच नाही तर इंग्रजांना भारत सोडून जाण्यास भाग पाडले म्हणून त्यांचा जाहीर सत्कारही होतो. या सत्काराचा

आणि श्रेयाचा फायदा हे देशमुख आपल्या पुढील राजकीय भविष्यासाठी करून घेतात.

या घटने नंतर पारधीलोक आपल्या जातभाईंचा शोध घेऊ लागले, पारध्यांवर इंग्रजांनी सोलापूरच्या तारेच्या कैदखान्यात केलेले अत्याचार एकमेकांना सांगू लागले. एवढेच नाही तर आपण स्वत: कपड्यांच्या गाठी वाहून नेणाऱ्या माल ट्रकच्या खालच्या दांड्याला चिकटून कशी सुटका करून घेतली हे अनुभवही सांगू लागतात. तसेच आपल्या बायका-मुलांना कोणत्या तुरूंगात ठेवले आहे हे शोधण्याचा प्रयत्न करतात. सेन्टलमेन्टमध्ये पारध्यांना गिरणीच्या कामावर जुंपल्यामुळे पारधी पळून गेल्याने सूतगिरणी बंद पडेल या भितीने त्यांना अट्टल गून्हेगार ठरवून त्याला पकडून आनणाऱ्यास सरकारी इनाम जाहीर करतात. आणि पारधी लोकांची दिसतील तिथे फौजफाट्यासह धाड घालण्यास सुरूवात करतात. अशीच धाड बिरडीस च्या पारधी वस्तिवर पडते तेव्हा सर्वजन पळून जातात. त्यावेळी वाघआवळ्या या व्यक्तीच्या पायाला गोळी लागते व ऐंशी वर्षाची बिरडीसची आई खुर्दाबाई आणि वाघआवळ्या हे दोघे पळता न आल्यामुळे पकडले जातात. गुन्हा कबूल न करणाऱ्या पारध्यांवर कसे अत्याचार करायचे याची इंग्रजी कायद्यात तरतूद होती. त्यानूसार वाघआवळ्यावर अमानूष अत्याचार केले जातात. त्या अत्याचारामुळे तो जिवंत राहाण्याची शक्यता कमी असल्याने त्याला दरीत ढकलून दिले जाते. मात्र तो पळून गेल्याची नोंद करून ते प्रकरण दडपून टाकले जाते. अशाप्रकारे पारधी जमातीवर होणारे हे अत्याचार अमानुष आणि अमानवी स्वरुपाचे होते. इंग्रज राजवट एकीकडे सामाजिक न्यायाची भूमिका घेत असतानाच भटक्या-विमुक्त जमातीसाठी मात्र ही व्यवस्था कशी घातक ठरत गेली होती याचे वास्तव चित्रण या कादंबरीतून केले आहे. पुढे इंग्रज राजवटीचा अस्त होऊन भारत स्वतंत्र झाला तेव्हा या गुन्हेगार ठरवलेल्या जातींना 'विमुक्त' या नावाने संबोधले

जाऊ लागले. याची नोंद या कादंबरीमध्ये केली आहे. एवढेच नाही तर त्या जमातींना मुक्त केल्यानंतर त्या जमातींनी काही संघटना स्थापन केल्या व त्या संघटनेद्वारे भटके-विमुक्त यांचे पूनर्वसन व्हावे, शेतजमिनी मिळाव्या, गुन्हेगारीचा शिक्का पुसून इतरांच्या बरोबरीने जगण्याचा अधिकार मिळावा इ. प्रश्नांसाठी संघर्ष करणारी भिमराव जाधव या कार्यकर्त्याने केलेली चळवळ या कादंबरीतून मांडली आहे.

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्याच्या आनंदात पारधी वस्ती थोड्या बेपरवाईने जीवन जगत असतानाच भारत सरकारने विमुक्त जमातींसाठी नवा कायदा लागू केला. या कायद्यानुसार जंगलातील झाडे तोडणे, पशु-पक्ष्यांची शिकार करणे गुन्हा मानल्यामुळे आता पारधी वस्तीने कसे जगायचे हा प्रश्न बिरडीसच्या पारधी वस्तीसमोर उभा राहतो. शिकारीला गेलेल्या पारधी लोकांना वनरक्षक पोलिस अटक करतात याचे वर्णन या कादंबरीत आले आहे. शेवटी पोटाची आग विझविण्यासाठी ते मासे, खेकडे धरणे, चोरी करणे इ. कामे करतात. त्यानंतर असे किती दिवस जीवन जगायचे म्हणून ते पडिक जमिनीत शेती करू पाहतात. पण त्यासाठी आवश्यक असणारा बैल-बारदाना, खत-पाणी मिळत नाही. गावकरी त्यांची हेटाळणी करतात. त्यामुळे हे पारधी इतरांनी पेरणी केलेले शेतातील बियाने मातीसहित चोरुन स्वतःच्या शेतामध्ये पसरवतात. त्यामुळे पारध्यांच्या शेतात मिश्र पिके डोलताना दिसतात. तसेच ते शेळ्या-मेंढ्या पाळू लागल्यापासून फासेपारधी, गायपारधी ही नावे जाऊन त्यांना धनगर पारधी या नावाने ओळखले जाऊ लागते.

पूर्वी कधी बारा कोसांवरचा दिवा न दिसणाऱ्या ठिकाणी मुक्काम करणारी पारधी वस्ती आपल्या पालात दिवा लावू लागते. पाहता पाहता पारध्यांच्या वस्तीवर पंधरा-वीस घरे एकत्र नांदू लागतात. प्रत्येकाच्या घरी शेळ्या, कोंबड्या पाळण्याचा व्यवसाय सुरू होतो. दारुच्या धंद्यावर त्यांचा विस्तार होऊ लागतो. अशा स्वरुपात

पारधी समाज बदलत असतानाच उस्मानाबादजवळील खेड्यात तात्यासाहेब पाटलाच्या वाड्यावर दरोडा पडतो. वाड्याच्या भिंतीला भोक पाडून चोरी करणारे लोक पारधीच असू शकतात. असा विचार करून पोलिस बिरडीस या पारध्यासह सर्वांचा छळ करतात. त्यांच्या घरातील प्रत्येक वस्तूची पावती मागतात. सर्व भांडी, शेळ्या, वस्तू जप्त करतात. घरच्या पुरुषांना पोलिस कोठडीत डांबून जनावरापेक्षाही वाईट छळ करतात. तेव्हा बाजीराव देशमुख सर्व पारध्यांची जामिनावर सुटका करतात. त्यांच्या सहाऱ्यामुळे पारधी वस्तीवर नवचैतन्य येते व त्यांचे कोणतेही काम करण्याचे पारधी आश्वासन देतात. त्याच काळात जिल्हा दूध संघाच्या निवडणुका येतात. त्यामध्ये बाजीराव देशमुख व त्यांच्या विरोधात उस्मानाबादचे नानासाहेब पाटील हे राजकीय स्पर्धक असतात. पूर्वी मराठवाडामुक्ती आंदोलनाच्या काळात मुसलमानांचा अतिरेक झाला. तेव्हा देशमुखांच्या वडिलांनी मुसलमानांना बेचिराख करून जमिनी बळकावल्या होत्या. नानासाहेब पाटीलही जमिनदार असल्याने ते बंदुकीच्या व सैनिकांच्या बळावर बाजीराव देशमुखांच्या जमिनी हडप करतात. त्यामुळेच वैमनस्य वाढते. नानासाहेब पाटील प्रचंड पैसा खर्च करून देशमुखाला निवडणुकीमध्ये शह देण्याची तयारी करू लागतात. त्यातून परंपरेने चालत आलेले वैमनस्य अधिकच वाढते. त्याच्यातच नानासाहेब पाटीलांच्या शेतातील धान्य आपल्या शेतात टाकण्याचे काम देशमुख पारध्यांना देतात. अशाप्रकारे बिरडीसच्या टोळीला चोरी करण्याची सवय बाजीराव देशमुखामुळे लागते. तेव्हापासून हे पारधी इतरांच्याही शेतात चोऱ्या करू लागतात. त्यामुळे पारध्यांविषयी संशय वाढत जातो. त्यानंतर देशमुखाच्या आदेशावरून पारधी लोक नानासाहेबांच्या घरावर दरोडा घालण्याची योजना करू लागतात. दरोडा घालण्यापूर्वी हत्यारांची, दगडगोट्यांची, चोरीच्या पैशाची व्यवस्था कशी करावयाची या सर्व गोष्टी हे पारधी योजनेनुसार तडीस नेतात. पारध्यांमध्ये संकटकाळी आपला बचाव करण्यासाठी आपल्याच

माणसाचे बलिदान देण्यास मागे-पुढे पहायचे नसते. म्हणून दरोड्यात पकडल्या गेलेल्या मानकाप्याची मान कापणे व पारध्याची निशाणी न ठेवणे हा पारंपरिक प्रघात या कादंबरीत वर्णन केले आहेत.

गावच्या जमिनदाराला खुश ठेऊन पारधी लोक दारू व्यवसाय करु लागतात. याशिवाय शेती करण्याचा चांगलाच नाद पारध्यांना लागतो. दारुतील आणि शेतीतील पैसे सुरक्षित राहावे म्हणून ते व्याजाने देऊ लागतात. त्यामुळे बिरडीसच्या पारधी वस्तीचे संबंध ढोकी गावातील लोकांशी अधिक जवळचे होऊ लागतात. निवडणुकीमुळे राजकीय पुढाऱ्यांची भाषणे ऐकूण राजकारण पारधी वस्तीला समजू लागते. आमदार पदाची निवडणूक लढविण्यासाठी बाजीराव देशमुख विरोधी नानासाहेब पाटील उभे राहिलेले असतात. देशमुखांच्या मदतीने पारधी लोक मतदार यादीत नाव नोंदवून ढोकी गावाचे नागरिक होतात. या काळात पारध्यांना दारू विक्रिमुळे चांगलाच फायदा होतो. त्यावेळी बाजीराव देशमुख बहुमतांनी विजयी होऊन आमदार बनतात आणि मागासलेल्या आपल्या विभागाला साखर कारखाना मिळाला पाहिजे अशी आग्रही भूमिका मांडतात. त्यामुळे शंभर एकर जमिनीवरती कारखाना उभा राहतो आणि शेतकऱ्यांपासून ते पारध्यांपर्यंत सर्वांच्या अपेक्षा उंचावतात.

इकडे पारधी वस्तीवर बिरडीस या पारध्याच्या मुलगा रानपळ्याचा विवाह जमविण्यासाठी तो गेंड्या या आपल्या जातभाईच्या मुलीला मागणी घालतो. गेंडयालाही रानपळ्या जावई म्हणून आवडतो आणि बिरडीसच्या पारधी वस्तीवर विवाहाची गडबड सुरू होते. अनेक पारधी परंपरा सांभाळत, कोडीयारा देवीच्या जयजयकारात, मोहाच्या दारुचे घुटके घेत, मांसाच्या बेतात विवाह आनंदात पार पडतो.

हातभट्टीच्या दारुमुळे दिवसेंदिवस पारध्यांची प्रगती होत जाते. ढोकीमध्ये पारधी चांगलाच संसार थाटतात. याची सर्व माहिती कारखान्याचे चेअरमन पतंगराव पाटलांना असते. आमदार देशमुखांचे ते मेहूणे असतात. कारखान्यात नव्या औद्योगिक प्रणालीचा वापर करून कारखान्यातील मळीपासून ते दारूचा प्रकल्प उभा करतात. त्यामुळे हातभट्टीचा दारू व्यवसाय करणाऱ्या लमान-पारधी लोकांचा व्यवसाय बुडाल्याने त्यांना अस्वस्थ वाटते. परंतु ही कारखाण्याची दारू पिल्यामुळे पिणाऱ्यांचे आरोग्य बिघडते. व बंद पडलेल्या पारध्यांच्या हातभट्टया पुन्हा तेजीत सुरू होतात. त्या बंद पाडण्यासाठी घाडगे पाटील या पोलिसांकरवी बाजीराव देशमुख व पतंगराव पाटील प्रयत्न करतात. ते पारध्यांच्या स्त्री-पुरूषांवर अत्याचार करतात. आणि वर्तमान पत्रामध्ये पारधी लोक चोर असल्याचे त्यांनी सांगितल्यामुळे गावातील शेतकरी पारध्यांची पीके जाळून टाकतात. आपल्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी रानपळ्या व तीरमाऱ्या ही तरूण पारधी मुले बादशहा या खतरनाक पारध्याच्या टोळीत सामील होतात. बादशहा या सर्व तरुण मुलांना घेऊन एका पाटलाच्या वाड्यावर दरोडा घालतो. त्यामध्ये सहभागी करून घेतलेल्या फौजदारालाही तो वाटा देतो. पारध्याच्या या टोळीचा दबदबा मराठवाड्यापासून आंध्र, कर्नाटकच्या काही पट्टयांपर्यंत वाढत जातो. तर दुसरीकडे हा पारधी गोरगरीब, गरजू शेतकऱ्यांना अडी-अडचणीत मदत करत असल्याने देवमाणूस म्हणून त्याचा लौकिक वाढतो. या पारध्याला जिवंत वा मुडदा पकडण्याचे आवाहन केले जाते. बादशहा पारधी वत्याचा भाऊ शंकर पारधी दागिने विकण्यासाठी सराफाकडे येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळते. त्यावेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात बादशहाचा भाऊ शंकर पारधी ठार होतो.

अशातच आमदारकीच्या निवडणूका येतात. या गोष्टीचा फायदा घेण्यासाठी बादशहा निवडणूकीला उभ्या राहिलेल्या सिंधुताई पवार यांची भेट घेऊन त्यांना निवडून

देण्याचे आश्वासन देतो. त्याबदल्यामध्ये पोलिसांपासून वाचविण्याची विनंती करतो. ती देखिल आपण निवडून आल्यानंतर बादशहाचा दरोडेखोरीचा धंदा बंद करून त्याला सन्मानाची नोकरी देण्याचे वचन देते. योजनेप्रमाणे सिंधुताई मताधिकाने निवडून येतात. आणि बादशहा पारधी व त्याच्या सहकाऱ्यांना शरण येण्यास सांगतात. तेव्हा रानपळ्या व त्याचे सहकारी त्यास नकार देतात. व स्वत: स्वतंत्र टोळी स्थापन करण्याचा प्रयत्न करतात. एकीकडे एका वर्षामध्येच बादशहा पारध्याची कैदखान्यातून निर्दोष सुटका झाल्यानंतर सिंधुताई काकूंच्या कारखान्यात तो प्रमुख रखवालदार म्हणून वावरू लागल्यामुळे त्यांचे राजकारणही सुरक्षितपणे चालु राहते. इकडे बेरोजगार रानपळ्या व त्याचे साथीदार छोटे-मोठे दरोडे घालू लागतात. पतंगराव पाटील व बाजीराव देशमुख या दोघांचा बदला घेण्यासाठी रानपळ्या हा पारधी फौजदार घाडगे पाटलांची बदली करण्यासाठी नानासाहेब पाटलांना सोने देतो व त्यांची बदली करून घेतो. त्यानंतर रानपळ्या कारखान्यातील दारुचे व साखरेचे ट्रक तलावात बुडवून आजुबाजूच्या गावात चांगलाच दरारा मिळवतो.

एके दिवशी रानपळया त्याच्या साथीदारासह शंभर किलोची रत्नजडीत मूर्ती पळवतो. त्यामुळे सर्व पारध्यांना व रानपळयाच्या कुटुंबाला पोलिस वेठीस धरतात. तेव्हा हा प्रश्न लोकभावनेशी जोडला असल्यामुळे नाना पाटलाच्या सांगण्यावरून तो मूर्ती देण्यास तयार होतो. परंतु, स्वत: देवाने माझ्याकडून या मूर्तीची चोरी करवून घेतली असे थोतांड रचून अंगामध्ये देव संचारल्याचा आव आणून मूर्ती परत मंदिरात ठेऊन पळ काढतो. रानपळयाची दहशत आणि धीटपणा वाढत असतानाच पळापळीच्या जीवनाला रानपळ्या कंटाळतो. आणि बादशहा पारध्यासारखे पोलिसांना शरण जाऊन सामान्य जीवन जगावे असा विचार करतो. त्यासाठी नानासाहेब पाटलांच्या मदतीने तो पोलिसांना शरण जातो. आणि लुटालूट करून

जमविलेला पैसा खर्च करून निर्दोष मुक्त होतो. त्यानंतर तो आपल्या कुटुंबासोबत शेतीवाडी करून त्यातून जमलेला पैसा लोकांना व्याजाने देऊ लागतो. पाहता पाहता मारवाड्या-ब्राह्मणांसारखा शेठ, सावकार होतो.बैल, गाई, म्हैशी, त्यांचे हंबरणे, ओरडणे हे पारधी वस्तीतील प्रगतीचे दर्शन सर्वांच्या सवयीचे होते. तसेच, निवडणूकीत अर्ज भरून ग्रामपंचायतीचा सभासद झाल्यापासून रानपळ्या पारधी वस्तीतील अडी-अडचणीवर बोलू लागतो. आपल्या मुलाचे नाव वकिल्या ठेऊन ते सार्थक करण्यासाठी स्वत: अडाणी असून मुलाला शाळेत घालतो. अशातच रानपळ्याची बायको बकरी हीच्या डोहाळे जेवणासाठी येणारे तिचे आई-वडील वीज कोसळून मृत्युमुखी पडतात. तेव्हा त्यांचे प्रेत पुरण्यास गावातील महार-मांग विरोध करतात. शेवटी एक मुस्लिम व्यक्ती त्यांना मदत करते. त्यानंतर तेथील सरपंच रहिवासीचा दाखला देत नसल्यामुळे अपघाती मृत्युमुळे मंजूर झालेले पैसे मृत पारध्यांच्या मुलांना मिळत नाही. रहिवासीचा दाखला मिळवण्यासाठी पारध्यांची खटपट, भूक भागविण्यासाठी त्यांनी चोरलेली शेळी, ज्वारीची कणसे यांमुळे संतप्त झालेल गावकरी पारध्यांना मारहान करतात. त्यामुळे भितीने हे सारे कळंबचे पारधी रेल्वेत बसून पळ काढतात.

इकडे बिरडीसच्या पारधी वस्तीवर पारध्यांना सहकार्य करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची बदली करून त्याजागी 'पारध्यांचे कर्दनकाळ' असणाऱ्या फौजदार घाडगे पाटलांची बदली केली जाते. त्यातच हे पारधी गावातील एका व्यक्तिची जमीन विकत घेण्याचा सौदा करतात. तेव्हा पारध्यांच्या या सुधारित स्थितीवर चिडलेल्या फौजदार घाडगे पाटील यांच्या सांगण्यावरुन बाजीराव देशमुख व पतंगराव पाटील पारध्यांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यासाठी एक गुप्त बैठक घेतात. त्यानुसार एका पहाटे गाढ झोपेत बेसावध असलेल्या पारधी वस्तीत्रर हजारोंचा जमाव काठ्या-कुऱ्हाडीने हल्ला करतो, संपूर्ण पारधी वस्ती बेचिराख

करतात. तीन-चार तासांनी पोलिस पारधी वस्तीवर येतात. तेव्हा दोनच पारधी जिवंत राहिलेले असतात. सर्व पारध्यांचे हत्याकांड होते. त्यामध्ये बाजीराव देशमुख, पतंगराव पाटील, आणि घाडगे पाटलांचे कारस्थान असल्याचे सांगून नानासाहेब पाटील आपण माणुसकीच्या बाजूने आहोत हे दाखवून देतात. पारधी हत्याकांडाबाबत गावातील कोणत्याही व्यक्तिला अटक होऊ नये आणि देशमुख व पाटील यांना वाचविण्यासाठी फौजदार घाडगे पाटील प्रयत्न करतात.

पारध्यांच्या या हत्याकांडात रानपळ्याची पत्नी बकरी व त्याचा भाऊ रानमळ्या जिवंत राहतात. अत्याचाराला कंटाळून बकरी मुंबईत आश्रय घेते. या ठिकाणी बकरी आपला मुलगा वकिल्याला ख्रिस्ती पाद्र्याच्या सहकार्याने शाळेत घालते. त्यावेळी कादंबरीमध्ये धर्मांतराचा एक उपस्थित केला जातो. पारध्यांवर अत्याचार होत असताना कोणीही धावून आले नाही. त्यावेळी कोणताही धर्म संरक्षणास आला नाही. ख्रिस्ती व्यक्तिने केलेले सहकार्य व वकिल्याला शिक्षणासाठी केलेली मदत बकरी या पारधीनीला मोलाची ठरते. 'धर्म मोठा की माणूस' या उक्तीचा प्रत्यय ही कादंबरी देते. शेवटी पारधी जातीचा शिकलेला मुलगा वकिल्या पुढील आयुष्य मानवतेसाठी खर्च करण्याचा संकल्प करतो. येथे कादंबरीचा शेवट होतो.

**घटनाप्रसंग : -**

कादंबरी हा वाङ्मयप्रकार गद्य वाङ्मयप्रकार म्हणून सर्वश्रुत आहे. या वाङ्मयप्रकारातून मानवी जीवनातले घटित अथवा कल्पित अनुभव मांडले जातात. कथन अथवा निवेदनाच्याद्वारे प्रत्यक्ष अथवा कल्पित अनुभव कथनाची एक कौशल्यपूर्ण केलेली क्रमबद्ध रचना म्हणून कादंबरीचे महत्त्व मानले जाते. अनेक घटना-प्रसंगांनी आशयसूत्र विस्तरीत करण्याला येथे महत्त्व असते. त्यामुळेच

कॅथरीन लीव्हर यांनी कादंबरीची व्याख्या करताना म्हटले आहे की, ‘‘कादंबरी म्हणजे कथनात्मक लिखित गद्याचा बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा लेखकांनी निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंतून टाकणारा रचनाबंध होय.’’[१] या व्याख्येचा विचार करता कादंबरीचा कथन व्यवहार, वर्णन, स्पष्टीकरण, भाष्य या क्रमाने घटना-प्रसंगाची मांडणी केली जाते. आशयाची परिणामकारकता वाढविण्यासाठी अथवा आशयसूत्राचे वैविध्य दाखविण्यासाठी विविध स्वरूपाचे घटनाप्रसंग कादंबरीमध्ये येतात.

प्रामुख्याने मानवी जीवनाला सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक संदर्भ असतात. मानवी जीवनाचा व्यापक पट कादंबरीतून मांडण्यासाठी या घटनांकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्यामुळे कादंबरीकार आशयसूत्राच्या केंद्रस्थानी संबंधित अशा घटना-प्रसंगांची मालिका गुंफत असतो. लक्ष्मण गायकवाड यांच्या ‘वकिल्या पारधी’ चा विचार करता या कादंबरीमध्ये या स्वरूपाचे अनेक घटना-प्रसंग कथन केलेले आहेत. त्यापैकी काही प्रमुख घटनाप्रसंग पुढीलप्रमाणे आहेत.

**घटनाप्रसंग : –**

१. इंग्रज लोक जंगलावर आपले अधिराज्य गाजविण्यासाठी आणि आदिवासी लोकांचा समूळ नाश करण्यासाठी जंगलातून रेल्वेमार्ग तयार करण्याची योजना आखतात. आदिवासी लोकांनी ही योजना उधळून लावल्याने इंग्रज लोक आदिवासींची धरपकड करतात व त्यांना रेल्वेकामाला जुंपतात. तेव्हा बिरडीस हा पारधी जमीनदार देशमुखाच्या सहाय्याने इंग्रजांच्या बंदुका आणि दारूगोळा लुटून इंग्रज सैनिकांनी भरलेली रेल्वे नदीमध्ये कोसळवून अनेक इंग्रजांचे बळी घेतात. या प्रसंगातून पारध्यांची सूडभावना कशी असते हे दिसून येते.

२. इंग्रजांनी आदिवासी पारध्यांना लावलेले रेल्वेमार्गाचे काम संपताच त्यांना शहराच्या बाहेर उंच तारेच्या कुंपनात ठेवतात. त्या कुंपनातील कोणी पळून जाऊ नये म्हणून वीज सोडलेली असते. दिवसातून चार वेळा त्यांची हजेरी घेऊन दिवसभर त्यांना कामाला जुंपत असत. कामचुकारपणा करणाऱ्या व्यक्तिला साखळदंडाने मारत किंवा ओझे वाहण्याचे बिगारी काम लावत. व पोटभर अन्नाऐवजी त्यांना एक वाटी तांदळाचे पाणी व एक वाटी भाकरी देत असत. इंग्रजांकडून पारध्यांची कशी अवहेलना झाली याचे हे वर्णन आहे.

३. ढोकी गावचे जमिनदार बाजीराव देशमुख हे त्यांचे प्रतिस्पर्धी नानासाहेब पाटील यांचा सूड घेण्यासाठी त्यांच्या वाड्यावर दरोडा घालण्याचा आदेश पारध्यांना देतात. त्यानुसार दरोड्यातील एक व्यक्ती साप सोडण्याच्या निमित्ताने वाड्याची पाहणी करतो. दरोडा घालताना कोणाच्या हाती लागू नये म्हणून हे लोक सर्व अंगाला तेल लावतात. रात्री वाड्याच्या भिंतीला भगदाड पाडून आत प्रवेश करतात. व सर्व संपत्ती घेऊन जातात. परंतु शेवटी वाड्यातील लोकांकडून पकडल्या गेलेल्या मानकाप्या या व्यक्तिची मान कापून घेऊन जातात. चोरीचा तपास लागू नये यासाठी पारधी लोक किती क्रूर मार्गाचा अवलंब करतात. यावर प्रकाश टाकणारा हा प्रसंग आहे.

४. पारधी लोकांची दिवसेंदिवस होणारी प्रगती सहन न झाल्याने पोलीस अधिकाऱ्याच्या सहकार्याने पतंगराव पाटील आणि बाजीराव देशमुख सर्व पारधी लोकांची हत्या घडवून आणतात. हे हत्याकांड घडून गेल्यानंतर पोलीस यंत्रणा येण्यास विलंब करतात आणि सर्व पुरावा मिटवून टाकतात. पारधी लोकांना गुन्हेगार ठरवण्यासाठी कसे नियोजन केले जाते. ते या प्रसंगातून प्रत्ययास येते.

५. बादशहा पारधी नावाचा दरोडेखोर माजोरी सावकारांना लुटून गरिबांना मदत करत असतो. एका पाटलाच्या वाड्यावर दरोडा घालण्यासाठी पोलिसांची जीप

अडवून, पोलिसांना बांधून, बंदुकीच्या धाकाने वाड्यावर दरोडा घालतो आणि मिळालेल्या संपत्तीतील काही भाग पोलिसांना देऊन संतुष्ट करतो. गुन्हेगारीचा शिक्का बसल्यामुळे पारध्यांनी गुन्हेगारी वृत्ती स्वीकारली यावर भाष्य करणारा हा प्रसंग आहे.

६. बादशहा पारधी या खतरनाक दरोडेखोराला पकडण्यासाठी अनेक राजकीय लोकांच्या तक्रारी येऊ लागतात. तेव्हा बादशहा व त्याचा भाऊ सराफाकडे येणार असल्याचे पोलिसांना कळताच पोलिस सराफाच्या घराला वेढा घालून त्यांना शरण येण्यास सांगतात. पण त्यांनी न ऐकल्यामुळे पोलिसांच्या गोळीबारात बादशहाचा भाऊ मारला जातो. त्यामुळे बादशहा पारधी पळून जातो. हा प्रसंग दरोडेखोरीतील कौशल्यावर प्रकाश टाकतो.

७. भारत सरकारच्या नव कायद्यानुसार जंगलात झाडे तोडणे किंवा शिकार करणे हा गुन्हा मानला जातो. तेव्हा पारधी लोक उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासाठी एका धनगराची शेळी मोठ्या शिताफीने चोरतात. शेळीचे कातडे कुणाला संशय येऊ नये म्हणून दूर अंतरावर जमिनीत पुरतात. भुरट्या चोरीद्वारे उपजीविका करणारे पारधी या प्रसंगातून दिसतात.

८. तात्यासाहेब पाटलाच्या वाड्यावर दरोडा पडतो तेव्हा घाडगे पाटील या फौजदारास पारध्यांवर संशय आल्याने ते पारध्यांचा जनावरापेक्षाही वाईट छळ करतात. पारध्यांवर केला जाणारा अमानवी छळ यातून दिसून येतो.

९. रानपळ्या हा पारधी रत्नजडित अशी बालाजीची मूर्ती चोरतो. अंगात देव संचारला व देवाने चोरी करण्यास प्रवृत्त केले असे वर्णन यात आले आहे. लोकांच्या दयाधिन दृष्टीचा उपयोग चोरीच्या व्यवहारात कसा केला जातो. याचे मनोरंजक वर्णन या प्रसंगात आले आहे.

१०. रानपळ्या या पारध्याचे सासु-सासरे गारपीठाच्या पावसामध्ये वीज कोसळून मृत्युमुखी पडतात. तेव्हा त्यांच्या मृतदेहांची विल्हेवाट लावताना सर्व पारध्यांची झालेली अवस्था, गावकऱ्यांकडून होणारी हेटाळणी आणि शेवटी एका मुस्लिम व्यक्तिची मदत मिळते. माणूस म्हणून किंमत नसणारे पारधी जीवन या प्रसंगात वर्णन केले आहे.

**व्यक्तिरेखा : -**

कादंबरी किंवा कथात्मक वाङ्मयप्रकारामध्ये व्यक्तिरेखांना महत्त्वाचे स्थान असते. आशयसूत्र आणि घटनाप्रसंगांची मालिका गुंफण्यासाठी व्यक्तिरेखांची अनिवार्यता असते. समाजामध्ये विविध प्रकारच्या प्रवृत्ती क्रियाशील झालेल्या असतात. त्या प्रवृत्ती विशिष्ट व्यक्तिरेखांमध्ये परावर्तीत करून कादंबरीकार कादंबरीचा विकास करत असतो. त्या व्यक्तिरेखांमध्ये सुष्ट-दुष्ट, नैतिक-अनैतिक, प्रेमळ-रागीट अशा विविध भावावस्था आढळतात. या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून कादंबरीकार सामाजिक मूल्यव्यवस्थेची मांडणी करत असतो. त्यामुळे कादंबरीच्या अंतरंगामध्ये व्यक्तिरेखांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. म्हणूनच या संदर्भामध्ये प्रतिपादन करताना मराठीतील वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशामध्ये म्हटले आहे की, "कादंबऱ्या व्यक्तिभोवतीच गुंतलेल्या असतात. व्यक्तिचित्रणाला तेथे प्राधान्य असते. व्यक्तिचित्रण करताना कादंबरीकार ज्या गोष्टीवर भर देतो त्यावर एरवी प्रत्यक्ष जीवनात फारसा भर दिला जात असतोच असे नाही. एरवीच्या जीवनातील माणसे ज्या गोष्टी संकोच्यामुळे व सौजन्यामुळे व्यक्त करत नाहीत. अशा गोष्टी, अशा कृती कादंबरीकाराने निर्मिलेली पात्रे सांगत असतात."[२]

व्यक्तिरेखा ही समाज, संस्कृती यांची वाहक असते. विशिष्ट काळ आणि त्या काळाचा व्यवहार त्या व्यक्तिरेखांच्याद्वारे साहित्यकृतीमध्ये अनुभवता येतो. याचाच अर्थ एखाद्या सामाजिक समस्येचे स्वरूप ज्ञात करून घेण्यासाठी व्यक्तिरेखेतून

मांडलेले व्यक्तिमत्व त्या कादंबरीच्या आशयाला समृद्ध करते. 'वकिल्या पारधी' या कादंबरीत आलेल्या गावगाड्यातील व्यक्तिरेखा आणि विमुक्त म्हणून जीवन जगणाऱ्या पारधी जमातीच्या व्यक्तिरेखा दोन समाजाच्या सांस्कृतिक संघर्षाचे प्रतिनिधित्व करतात. त्या व्यक्तिरेखा खालीलप्रमाणे आहेत.

१.बिरडीस :-

बिरडीस ही कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. जंगली माणसासारखा उंच धिप्पाड, दनकट शरीराचा, तांबूस-पिंगट डोळ्यांचा आणि देवीच्या नावाने केस वाढविणारा असला तरी समंजस, व्यवहारज्ञानी आणि वैचारिक वृत्तीचा होता. तसेच तो प्रामाणिक, सर्वांना आधार देणारा असून आपल्या जमातीविषयी अभिमान बाळगणारा व तिच्या उन्नतीविषयी प्रयत्न करू पाहणारा असे त्याचे व्यक्तिमत्व चित्रित केले आहे. विश्वास संपादन करणारी, पारधी जमातीविषयी संपूर्ण निर्णय घेणारी ही व्यक्तिरेखा आहे.

२. रानपळ्या :-

बिरडीसचा मोठा मुलगा, इंग्रजांबद्दल मनात द्वेष बाळगणारा, त्यांचा घोडा पळवून लावणारा, लहान भावाला सांभाळून वडिलांच्या वृद्धावस्थेत पारधी वस्तीचा कर्ता-धर्ता बनणारा, सन्मानाने जगता यावे यासाठी पोलिसांना शरण येणारा अशी रानपळ्याची व्यक्तिरेखा कादंबरीत आलेली आहे.

३. बाजीराव देशमुख :-

ढोकी गावचा जमिनदार पारध्यांना सहकार्य करून त्यांचा राजकारणात उपयोग करून घेणारा, वाघाची चामडी असलेल्या सिंहासनावर बसून स्वतःच वाघाची शिकार केली म्हणून मिरवणारा, नानासाहेब पाटलाच्या वाड्यावर दरोडा घालून सर्वात श्रीमंत जमिनदार होण्याची आकांक्षा बाळगणारी ही व्यक्तिरेखा आहे.

४. नानासाहेब पाटील :-

इंग्रजांविद्ध लढा देताना नंतर स्वातंत्र्यसैनिक या बिरुदावलीत समाधानी होणारे, घरावर दरोडा पडल्याच्या प्रसंगाने दु:खाधीन होणारे असे राजकीय व्यक्तिमत्व.

५. घाडगे पाटील :-

बाजीराव देशमुखांच्या नातेसंबंधातील, पारधी लोकांवर जुलूम करणारे पोलिस अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक असतो. पारध्यांचा कर्दनकाळ म्हणूनच कादंबरीत त्यांचे व्यक्तिमत्व येते.पारध्यांच्या हत्याकांडात अग्रभागी असून पुरावे नष्ट करणारा, क्रूर मानवी व्यवहार करणारा पोलिस अधिकारी म्हणून ही व्यक्तिरेखा कादंबरीत येते.

६.पतंगराव पाटील :-

साखर कारखान्याचे चेअरमन, जमिनदार देशमुखांचे मेहूणे असून त्यांच्या सल्ल्याप्रमाणे पारध्यांना त्रास देणारे आणखी एक व्यक्तिमत्व म्हणून पतंगरावांची व्यक्तिरेखा येते.

७.बकरी :-

रानपळ्याची पत्नी, संपूर्ण घरदार उध्वस्थ झाल्यानंतरही मुलाच्या निमित्ताने आशेचा अंकुर फुलवू पाहणारी, परिस्थितीपुढे हतबल न होता सामना करणारी व आपल्यावरील अन्यायाचा जाब विचारणारी बंडखोर स्त्री, दारिद्र्यातही शिक्षणाचा संकल्प करून मुलाकडून उज्वल भवितव्याची अपेक्षा बाळगणारी जिद्दी स्त्री म्हणून बकरीची व्यक्तिरेखा येते.

८.फादर गोन्साल्व्हिस :-

एक सेवाभावी व्यक्तिमत्व म्हणजे फादर गोन्साल्व्हिस. अनाथ गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण देणारी, बकरी या पारधीणीच्या वकिल्या या मुलावर प्रेम करणारी,

त्या मुलाला स्वत:चे आडनाव देऊन जाती-धर्माची बंधने न पाळता मानवता धर्म जोपासणारी फादर ही महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. भारतीय धर्मव्यवस्था आणि इंग्रज इंग्रज राज्यकर्ते ज्या पारध्यांना गुन्हेगार समजतात त्या पारध्यांसाठी फादर यांनी दाखविलेली माणूसकी वेगळे परिमाण देणारी आहे.

९.वकिल्या :-

बकरीचा मुलगा वकिल्या, फादर गोन्साल्व्हिस यांच्या सहवासात तो शिक्षण घेत असल्यामुळे सुशिक्षितांचे गुणधर्म अंगी बाळगतो. त्यातूनच पारधी जमातींवरील अन्याय दूर करण्याची स्वप्ने पाहतो. शिक्षणामुळे गुन्हेगार जमातीत कसा बदल होतो. याचे चित्रण कादंबरीत वकिल्या या पात्राद्वारे केले आहे.

१०. बादशहा पारधी :-

काळासावळा रंग, करडी नजर, पिंगळ्यासारखे डोळे असलेला, झुपकेदार मिशांचा खतरनाक डाकू असला तरी माजोरी सावकारांना लुटून गोरगरिबांना मदत करणारा, मोठे दरोडे घालून दहशत माजविणारा पण उत्तरार्धात मात्र पोलिसांना शरण जाऊन सन्मानाने जीवन जगण्याची अपेक्षा करणारी अशी व्यक्तिरेखा आहे.

११. संजय चौधरी :-

पारध्यांच्या समस्यांकडे सहानुभूतीन पाहून त्यांना मदत करणारी पोलिस खात्यातील ही एकमेव व्यक्तिरेखा कादंबरीत आली आहे. विशेष म्हणजे पारध्यांवर होत असलेल्या अत्याचाराचा अहवाल शासनाकडे पाठवून पारध्यांना मानवतेच्या दृष्टीने मदत मिळावी अशी अपेक्षा करते.

याशिवाय अनेक गौण व्यक्तिरेखांचा अंतर्भाव या कादंबरीत आहे.

पारधी जमातीशी संबंधित व्यक्तिरेखा :- जळन - ही बिरडीस या पारधी प्रमुखाची पत्नी असून परिस्थितीनुसार हजरजबाबी बनलेली आहे, वाघआवळ्या - बिरडीस या पारध्याचा भाऊबंद, पोलिसांच्या गोळीने जखमी होऊन त्यांच्या अमानुष

अत्याचाराने क्रूरपणे मारला जातो, गेंड्या - कळंब या ठिकाणी राहणारा पारध्यांचा जातबंधु, त्याची बकरी ही मुलगी रानपळ्याला दिली जाते, काळविट्या - स्वातंत्र्यलढ्यामध्ये नाना पाटलांना सहकार्य करून देखिल गुन्हेगारीचा शिक्का माथी बसलेली व्यक्ती होय. जंगल्या - इंग्रजांनी पळवून नेलेला बिरडीसचा बाप होय, मानकाप्या - बिरडीसचा भाऊबंद, दरोड्यामध्ये पकडला गेल्याने पारधी लोकच पुरावा न ठेवण्यासाठी त्याची मान कापून नावाप्रमाणे त्याचे आयुष्य सार्थकी लावतात, भीमराव जाधव - गुन्हेगार संघटना स्थापन करणारी टकारी जातीची तरूण व्यक्ती, मंगळी- वाघआवळ्याची पत्नी परंतु पुढे मानकाप्याशी दुसऱ्यांदा विवाहीत होते. त्याच्याही मृत्युनंतर वैधव्याचे जीवन जगते. काडतुस्या - हा मंगळीचा मुलगा, रानपळ्या - बिरडीसचा छोटा मूलगा, पारधी हत्याकांडामध्ये बचावलेला, पण मोठ्या आरोपाखाली नाहक शिक्षा भोगणारा, रहिमान्या - बादशहा पारध्याच्या टोळीमध्ये सहभागी झालेला, पुढे मुंबईला स्थलांतर करून बकरी या बहिणीला मदत करू पाहणारा, संगितराव - रहिमान्याचा मुलगा, तारक्या- रहिमान्याचा चुलतभाऊ, सायब्या - संगितरावचा मित्र, जेलवंती - जेलमध्ये जन्मलेली बकरीची मुलगी, बादशहाचा भाऊ शंकर पारधी. याशिवाय बादशहा पारधी जत्रेच्या निमित्ताने गावकऱ्यांच्या प्रश्नांचा न्यायनिवाडा करतो. त्यामध्ये सावळा पारधी, त्याची बायको केवळी, बारका पारधी, तीरकामठा, इ. क्षणीक व्यक्तिरेखा येतात.

**राजकारणाशी संबंधीत व्यक्तिरेखांमध्ये :-**

सिंधुताई पवार - गावाच्या राजकारणापासून ते जिल्ह्याच्या राजकारणापर्यंत विरोधकांना पाणी पाजणारी म्हणून ख्याती, आपल्या वडिलांकडून राजकारणाचे धडे घेणारी, पारध्यांच्या हिताचा विचार करणारी ही महत्त्वाची व्यक्तिरेखा, चिमाजीराव - पारधी लोकांना स्थायिक होण्यात अडथळे आनणारे कळंबचे सरपंच, मदन पाटील



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

- कुळगावचे सरपंच, तिरसिंगराव पाटील - खासदारकीच्या निवडणूकीला उभी राहणारी व्यक्ती, प्रविण जोशी - हिंदू धर्माचे रक्षण करू पाहणारी पण त्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणारी व्यक्ती, पोलिस खात्यातील व्यक्तिरेखांमध्ये कल्लूरकर - पारध्यांवर अत्याचार करणारे व्यक्तिमत्व, अमरसिंग - पोलिस महासंचालक. बादशहा पारध्याला जिवंत वा मुडदा पकडण्याचे आवाहन करणारी व्यक्तिरेखा.

त्याशिवाय रहिमान्याची फसवणूक करणारा गाडी मालक, डॉक्टर, मुंबईतील झोपडपट्टीचा दादा यादवभाई, सरकारी प्रवृत्तीचे तहसीलदार सोनवणे, गावकरी अंकुश कोळी, पारध्यांकडील दारूचे हप्ते गोळा करणारे दिनकर पाटील, जमादार तानाजी मोहिते, बकरीला जेलमध्ये मदत करणारी मालनबाई. इ. व्यक्तिरेखांचा अंतर्भाव होतो.

**निष्कर्ष:-**

१. लक्ष्मण गायकवाड हे विमुक्त जातीपैकी वडार जातीचे असून पारधी जमातीच्या वेदना परिणामकारकरित्या 'वकिल्या पारधी' या कादंबरीतून मांडण्यात ते यशस्वी झाले आहेत.

२. वकिल्या पारधी ही कादंबरी आदिवासी, ग्रामीण, शहरी तसेच सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा विविध स्तरांमधये वावरताना दिसते.

३. आदिम कालखंडातील पारधी जमातीचे मागासलेले जीवन आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पारधी जमातीचे सुधारित जीवन असा फार मोठा कालखंड या कादंबरीमध्ये व्यापलेला असून इतिहासाच्या आधारे वर्तमान समस्यांचे केलेले शब्दांकन म्हणून ही कादंबरी महत्वाची आहे.

४. पारधी जमातीची इंग्रज, पोलिस आणि उच्च जातीपासून न संपणारी कुचंबना या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.

५. अज्ञानामध्ये जीवन जगणाऱ्या पारधी जमातीमध्ये शिक्षणामुळे त्यांची उपेक्षा कशी झाली याबद्दल ही कादंबरी भाष्य करतेच, त्याचबरोबर त्यातून सुटका होण्यासाठी शिक्षणाचा मूलमंत्र देऊन ही कादंबरी संपते.

**संदर्भ :-**


१. (मराठी वाङ्मय संकल्पना कोश पृ.११७)

२. (वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश/ संपादक प्रभा गणोरकर व वसंत डहाके आणि इतर/ प्रकाशक-ग.रा.भटकळ फौंडेशन/ मुंबई, प्र.आ/२००१. पृ.१७५.)